’’ आदिवासी उपयोजनांचा अनुसूचित जमातीवर (आंध समाज) झालेल्या आर्थिक व समाजिक परिणामांचा अभ्यस ’’

विशेष संदर्भ :– हिंगोली जिल्हा कालखंड 2004 ते 2014

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विघापीठ़ नांदेड.

अंतर्गत सामाजिकशास्त्रे विघाशाखेतील ‘ अर्थशास्त्र ’ विषयाच्या

पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणा–या

शोध प्रबंधाचा आराखडा

–: संशोधक :–

मंगल नागोराव मारकड

एम.ए. (अर्थशास्त्र). बी.एड, सेट,नेट

:मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. जे.एस. भोयर

कै. बाबुराव पाटील कला, विज्ञान

महाविद्यालय, हिंगोली – 431513

“आदिवासी उपयोजनांचा अनुसूचित जमातीवर आंध समाज झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामाचा अभ्यास :– विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा कालखंड 2004 ते 2014 ”

प्रस्तावना :–

भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेल्या मानव समाजाच्या समुहाने बनलेली आहे. वंश, भाषा, धर्म, संस्कृती इत्यादी बाबतीत भारतीयांमध्ये विविधता आहे. प्रत्येक मानव समाजाच्या संस्कृतीमध्ये काही समानता, काही मतभेद असणे स्वाभाविक आहे. सर्वच मानव समाज विकासाच्या एकाच अवस्थेत नसतात. काही समाज आकाराने लहान, अप्रगत आणि संस्कृती विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत नसतात. काही समाज आकाराने लहान, अप्रगत आणि संस्कृती विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत असलेले आढळतात. भारतात असे अनेक लहान–मोठे समाज समुह आहेत. अशा अदिम किंवा आदिवासी लोकांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास प्रामुख्याने सामाजिक मानवशास्त्रात केला जातो. इंग्राजांच्या आगमनानंतर भारतातील आदिवासी समाजाच्या वस्तुनिश्ठ अभ्यासाला चालना मिळाली.

प्रारंभीच्या काळात 19 व्या शतकात एच.एच.रिसे, डॉल्टन, ओमेली, रसेल, कुस, कम्बेल इत्यादी प्रशासकांनी भारतातील भारतातील जाती–जमाती विषयी संशोधन केले. त्यानंतर रिव्हर्स, जे. शेक्सपिअर, गुर्डीन, शरदचंद्ररॉय इत्यादी संशोधकांनी वेगवेगळया आदिम जमातीवर संशोधन ग्रंथ लिहले आणि भारतातील आदिवासींच्या संशोधनाला गती मिळाली. त्या दृष्टीने आजही आदिवासींच्या जीवनात होणारे बदल व त्यांच्या समस्या यांच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले. आधुनिक भारताच्या जडणघडणीत, राष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत व मायभूमीच्या रक्षणार्थ या जमातीचा सहभाग फार मोठा आहे.

आधुनिक भारताचा समाजशास्त्रीय विचार करतांना ‘शहरी भारत’ आणि‘ग्रामिण भारत’ विभाजन केले जाते. असे विभाजन करतांना एका महत्वाच्या परिसराकडे आणि समुदायाकडे आपले दुर्लक्ष होते. हा समुह म्हणजे वनवासात राहणारा अदिम भारत होय. हा समाज बहुतांशी निर्धन, निरक्षर असला तरी त्या समाजाची अर्थपूर्ण संस्कृती आहे. त्याला स्वतःची बोली आहे. रितीरिवाज आहेत. दैवते आणि धर्मविधी आहेत. हा समाज विभुतीपुजा, झुंडशाही आणि हिंसाचार हया दुर्गुणापासून अलिप्त आहे. हयाचे कारण या समाजाला सुदृढ व समृध्द सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे.

- आदिवासी समाजाच्या व्याख्या :–

  1) डब्ल्यु. जे. पेरी यांच्यामते–

  "समान बोलीभाषा बोलणा–या एकाच भूप्रदेशावर राहणा–या समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात."

" A Tribe is a group speaking comman dialect and Inhabiting a comman Territory" – W.J. Perry

2 गिलीन आणि गिलीन यांच्यामते–

"आदिवासी समाज म्हणजे एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाश बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटांचा समुचय होय"

3 मदन व मुजुमदार यांच्यामते –

"समान भाषा व समान संस्कृती असणा–या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधीत असणा–या ग्रामीण समुदायाच्या एकत्रित उल्लेख आदिवासी समाज महणून करतात."

"A cluster of village communities which share a comman Territory language and Economically Interwoven is often also designated as tribe"

- आदिवासी समाजाची वैशिष्टये :–

  महाराष्ट्रात आदिवासींच्या ज्या अनेक जमाती आहेत. त्या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्टये, चालिरिती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा आढळत नाही. प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळी वैशिष्टये आढळतात. प्रत्येक जमातीचा मानसिक पिंड व्यापक सामाजिक जीवन हे त्यांच्या भोवतालच्या भौगोलिक, आर्थिक आणि पारंपारिक चालत असलेल्या आणि रुढझालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहेत. तसे असले तरी सर्व सामान्य आदिवासीचे जीवन, त्यांचे मुल्ये आणि वैशिष्टये यांच्या थोडा सारखेपणा आढळतो. सर्व सामान्यपणे आदिवासी हा भोळाबाबडा, अबोल,त्रयस्ताबरोबर शक्यतो बोलण्याचे टाळणारा, प्रारंभिक पापभीरू, दैववादी, परंपरागत जीवनदृष्टीचा, निसर्गाच्या सानिध्यात रमणारा, जीवनाचा स्वच्छंद्रपणे आनंद लुटणारा

आहे. तो जंगल, द–याखो–यात राहणारा असला तरी त्याची राहणी त्याच्या निर्मळ अंतकरणाप्रमाणे साधी व स्वच्छ आहे. त्याच्या जीवनाकडे पाहण्याचे स्वतंत्र वेगळी दृष्टी आहे. गाणी व नृत्य हे आदिवासींचे वैशिष्टये होय. आदिवासी जमातीमध्ये आढळून येणारे ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

1) विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य व त्या विषयी आपुलकी.
2) स्वतंत्र्य बोलीभाषा पण लेखनकलेचा आभाव.
3) एकाच पूर्वजापासून उत्पत्ती.
4) साधी अर्थ व्यवस्था.
5) सामाजिक एकजिनसीपणा.
6) अलिप्तता.
7) दुर्गम भागात अधिवास.
8) सामाजिक नियंत्रण.
9) रक्त संबंधावर आधारित एकात्मिक संघटन.
10) लहान आकार.

आशा प्रकारे आदिवासी जमातीचे विविध वैशिष्टये आहेत.

- आदिवासी समाज हा इतर समाजाच्या दृष्टीने आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, बाबतीत मागासलेला असल्यामुळे आदिवासी समाजासमोर अनेक समास्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने दोन प्रकारच्या समस्या आहेत.

1) आदिवासींच्या परंपरागत जीवन पध्दतीतून निर्माण झालेल्या समस्या –
2) इतर संस्कृतीच्या संपर्काने निर्माण झालेल्या समस्या :–

व्रील दोन्ही समस्यांचा विचार करता आदिवासींच्या समस्यांचे खालील प्रमाणे प्रकार दाखविता येतात.

अ) आर्थिक समस्या
ब) सामाजिक व सांस्कृतिक समस्या
क) आरोग्य विषयक समस्या
ड) शासनाच्या प्रतिकुल धोरणामुळे निर्माण झालेल्या समस्या

अ) आर्थिक समस्या

1) आदिवासी जमिनीचा प्रश्न.

2) स्थानांतरीत शेती.

3) जमिन मालकी व जंगला संबंधी समस्या.

4) मुद्रा प्रधान अर्थव्यवस्था व कर्जबाजारीपणा.

5) औद्योगिक क्षेत्रातील आदिवासींच्या समस्या.

6) वन जमिनीवरील अतिक्रमणाच्या समस्या.

ब) सामाजिक व सांस्कृतिक समस्या

1) व्दिभाषीपणा.

2) अनिष्ट प्रथांचा शिरकाव.

3) व्यसनाधिनता.

4) वैवाहिक जीवन आणि अस्थिर कुटूंब व्यवस्था.

5) लग्नविधी व जन्म मृत्युच्या कार्याचा कर्ज बाजारीपणाच्या समस्या.

6) धर्म, अंधश्रध्दा.

7) सामाजिक दोष आणि मागासलेपणा.

8) शहरीकरणाचापरिणाम.

9) बोगस आदिवासीचा प्रश्न.

10) आदिवासीमधीसल सांस्कृती बदल.

11) शैक्षणिक समस्या.

क) आरोग्य विषयक समस्या

आदिवासी समाजात प्रचलित असलेल्या रिवाजानुसार आजारपणामध्ये डॉक्रांकडे उपचार न करता. जादु–टोण्याच्या किंवा मंत्रा–तंत्राच्या साहयाने एखादे दुखणे दुर करण्याचा प्रयतन होत असलयमुळे आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात. प्रतिकुल जीवनमान आणी रसकस आहाराच्या आभावामुळे भारतीय आदिवासी जमातीमध्ये कुपोषणाच्या समस्येने विकाळ स्वरूप धारण केले आहे.

ड) शासनाच्या प्रतिकुल धोरणामुळे निर्माण झालेल्या समस्या

1) आदिवासी समाजासिवषयी थोडीशीही आपुलकीची भावना नसलेल्या लोकांची आदिवासींच्या भागात अधिकारी महणून नियुक्ती झाल्याने त्या अधिका—यांना आदिवासीच्या दुखाबददल जाण नसल्याने त्यांच्या समस्यांकडे गांभिर्यानॅ पाहिले जात नाही.

2) आदिवासी ज्या प्रदेषात राहतात. त्या प्रदेषातील औषधी वनस्पती, मोहफुले, वाळु, कच्चे धातु, दगडी कोळसा गोळा करणे, वन्य प्राण्याची शिकार करणे, वनखात्याच्या क्षेत्रामध्ये शेतीसाठी जमिनी कसणे इत्यादीवर बंदी घालण्यात आली. त्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी शासनाची परवानगी घ्याव लागते. त्यामुळे आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती धोक्यात आले आहे.

आशा प्रकारच्या आदिवासी समाजासमोरील समस्या आहेत.

- आदिवासी समाजासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदी :—

भारतीय समाजातील अत्यंत मागासलेला गट म्हणून आदिवासींना काही घटनात्मक तरतूदी सवलती दिलेल्या आहेत. त्यामध्ये विद्यर्थ्यांना शिष्यवृत्या, शाळेच्या फी मध्ये माफी, विशेष अनुदानित सरकारी नोक—यामध्ये राखीव जागा इत्यादी गोष्टींची तरतूद आहे. या सवलती घेण्यास ज्या जमाती पात्र आहेत. त्या जमातींना वर्गीकृत जमाती असे म्हटले जाते. या जमातीची यादी करण्याची तरतूद घटनेमध्येच आहे व वर्गीकृत जमाती घोषीत करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. भारतात वर्गीकृत जमातीची पहिली यादी 1950 ला झाली. राष्ट्रपतींनी दुसरा एक वटहुकुम जारी करुन भारतातील आदिवासींच्या कल्याणाविषयीचे खाते निर्माण करण्यात आले. आदिवासी कल्याणाच्या कार्यक्रमाला पंचवार्षिक योजनामुळे चांगलीच गती मिळाली व आदिवासीच्या कल्याणासाठी प्रत्येक पंचवार्षीक योजनेमध्ये भरपूर निधी उपलब्ध करण्यात आला.0

1) घटनेच्या 16 व्या भागातील कलम क्रमांक 330 ते 332 नुसार लोकसभेत व राज्याच्या विधानसभेत आदिवासींच्या प्रतिनिधीकरीता लोकसंख्येच्या आधारावर काही राखीव जागा ठेवण्याची तरतूद केलेली आहे.

2) घटनेच्या 338 व्या कलमानुसार अनुसूचित जाती व जमातीच्या संरक्षणासाठी राष्ट्रपतीला विशेष अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे. आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असणा–या योजना विषयी सल्ला–मसलत हा अधिकारी राष्ट्रपती समवेत करू शकतो.

3) घटनेच्या चौथ्या भागातील 164 कलमानुसार आदिवासींची अधिक वस्ती असलेल्या विविध राज्यामध्ये आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासासाठी एक स्वतंत्र मंत्री नियुक्त करण्याची तरतुद करण्यात आली. शिवाय आदिवासींच्या कल्याणासाठी मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार यांनी खास निधी उपलब्ध करून द्यावा अषी तरतुद करण्यात आली.

आशा प्रकारच्या विविध घटनात्मक तरतुदी आहेत.

- आदिवासी समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेले प्रयत्न :–

  अनुसुचित जामतीच्या वैशिष्टपुर्ण संस्कृतीला धक्का न लावता त्यांना समाजाच मुख्य प्रवहात आणण्यासाठी शासनस्तररावर विविध प्रयत्न करण्यात येतात. प्रामुख्याने सांगायचे झाल्यास आदिवासींना त्यांच्या स्वतः च्या क्षमता आणि प्रतिभेनुसार विकासाचीसंधी मिळावी महणुन त्यांना आदिवासी विकास संचालनालयातर्फे आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. आदिवासी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक शिष्यवृत्या देण्यात येतात. वेगवेगळे प्रशिक्षण देण्यात येतात. त्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी वेगवेगळया योजनाच माध्ययमातून आर्थिक मदतसुध्दा देण्यात येते. त्याच बरोबर आदिवासींना जंगल आणि जमिन यांच्या संदर्भातील विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे आदिवासी विकासाचा निर्देशांकासाठी खर्च झालेल्या पैसा हा नसुन आदिवासींच्या जीवनमानाचा दर्जा असतो. आषा प्रकारे शासनाकडून आदिवासी समाजाच विकासासाठींी प्रयत्न करण्यात आले.

- आदिवासी उपयोजना :–

  आदिवासी समाजाच सर्वांगिण विकासाठी विशेष धोरण काय असावे ? या बाबत पाचव्या पंचवार्षिक योजनेबरोबरच आदिवासी विकासासाठी स्वंतत्र आदिवासी उपयोजना तयार करण्याबाबत सुचना दिल्या आणि 1975–76 साली आदिवासी उपयोजना **(Tribal Sub-Plan)** ही विकास पध्दती अस्तित्वात आली.

आदिवासी उपयोजनेची मुळ संकल्पना ही क्षेत्र विकासाच्या संकल्पनेवर मुख्यत्वे आधारीत होती. आदिवासी लोकसंख्या जास्त प्रमाणात असलेल्या अनुसुचित क्षेत्राचे विशेष गट **I.T.D.P** (Integrated Tribal Development Project) 'एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प/गट' पाडुन या क्षेत्राचा सर्व विभागातर्फे जे काही विकासावर खर्च होईल त्याचे प्रामुख्याने मुलभूत सोयी उभारण्यावर होणारी गुंतवणूक यांचे पुर्ण नियंत्रण आणि वेगळा हिषोब ठेवला जावा या संकल्पनेवर दरवर्षी आदिवासी योजनेअतंर्गत विविध विकास योजना राबविण्यात येतात. सन 1986 पासून नियोजनाचा मुख्य उददेष आदिवासी कुटूंबाचा विकास असावा असे मानून आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या बाहेरील आदिवासीवर वैयक्तीक लाभाच्या योजनेअंतर्गत होणारा खर्च हा सुध्दा आदिवासी उपयोजनेत व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील विकासासाठी होत असलेला खर्च एकत्रित करुन आदिवासी उपयोजना अमतल आणली जात आहे.

या आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत खालील 9 मुख्य शिर्षकाखाली आदिवासी जनतेकरीता वैयक्तिक लाभाच्या व क्षेत्र विकासाच्या योजना राबविण्यात येतात.

1) कृषी संलग्न सेवा

2) ग्रामिण विकास

3) विशेष क्षेत्रिय कार्यक्रम

4) पाटबंधारे व पुरनियंत्रण

5) विद्युत विकास

6) उद्योग व खनिजे

7) वाहतुक व दळणवळन

8) सामान्य आर्थिक सेवा

9) सामाजिक व सामुहिक सेवा

अशा प्रकारे केंद्रीय विषेश साहायातून आणि राज्य सरकारच्या साहायातून विविध योजना अनुसूचित जमातीच्या विकासासाठी राबविण्यात येतात.

- अनुसुचित जमात (आंध) समाजाची पार्श्वभुमी :–

आदिवासी आंध ही एक अदिम जमात आहे तिचे वास्तव्य महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश या राज्यमध्ये आहेत. महाराष्ट्रत या जमातीची वस्ती विदर्भ आणि मराठवाडयातील काही जिल्हयामध्ये दिसून येते त्यात यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा या विदर्भातील चार जिल्हयामध्ये आंध जमातीचे लोक राहतात. तर मराठवडयातील हिंगोली,नांदेड, जालना, परभणी या चार जिल्हयात आंध जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहेत. मुळातच आंध जमातीचे लोक डोंगराच्या पायथ्याषी कडेकपारीत. रानमाळात व द–या खो–याच्या भूभागात राहतांना दिसतात त्यामुळे विकासाची गंगा त्यांच्या र्प्यंत पोहचण्यास उशीर होत आहे. आणि ही बाब आंध जमतातीला विकासाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी निश्चितच चांगली नाही.

- अभ्यास विषयाची निवड :–

भारतीय समाज व्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणजे आदिवासी समाज होय. विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या एखाद्या घटकाच्या समस्येकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वच समाजाचा विकास घडून आणणे अभिप्रेत असते. परंतु इतर समाज आणि आदिवासी जमाती यांच्या मधील अंतर केवळ भौगोलिक नसून मुलत सांस्कृतिक आणि आर्थिक स्वरूपाचे आहे. लोकशाही राजय हे सर्व लोकांचे राज्य असल्यामुळे आदिवासी आणि इतर समाज यांच्यातील हे सांस्कृतिक आणि आर्थिक स्तरावरील अंतर कमी करणे आवश्यक झााले आहेत. म्हणून शासनस्तरावरून आदिवासीचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपयोजना राबविणेही सुरू झाले. अर्थातच त्यांच्यावरील खर्च आदिवासी भागांसाठी जास्त करण्याचे धोरण होते. मात्र पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला नवा दृष्टीकोण अवलंबविण्यात आला त्यानुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प निर्माण करण्यात आले या प्रकलपातंर्गत आदिवासी उपयोजना लागू करण्यात येवून आदिवासींचे प्रश्न लखात घेवून विविध योजना अमलात आणण्यास सुरूवात झाली.

2011 सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या 1,05,10,213 एवढी असून राज्याच्या एकुण लोकसंख्येशी हे प्रमाणे 9.35 टक्के एवढे आहे. तसेच मराठवाडयाची एकुण लोकसंख्या 1,87,31,872 एवढी असून त्यामध्ये 7,46,041 एवढी आदिवासी लोकसंख्या आहे. एकुण लोकसंख्येशी हे प्रमाणे 3.98 टक्के आहे. हिंगोली जिल्हयात अनुसुचित जमातीची लोकसंख्या 1,11,954 एवढी असून एकुण जिल्हा लोकसंख्येशी हे प्रमाण 10.52 एवढे आहे. तसेच हिंगोली जिल्हयामध्ये मराठवाडयातील एकुण आदिवासी पैकी 15 टक्के आदिवासींचे वास्तव्य आहे. हिंगोली जिल्हयात आढळुन येणारे आदिवासी हे आंध जमातीचे आहे. जिल्हा ठिकाणावरील अगदीच अल्पसंख्येने असलेले अनिर्देषित आदिवासींचा अपवाद सोडला तर हिंगोली जिल्हा हा राज्यामधला असा एकमेव जिल्हा आहे कि जेथे केवळ एकाच जमातीचे लोक आढळतात. या कारणामुळे आदिवासी उपयोजनांचा आंध समाजावर झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांची आवश्यकता वाटत असल्यामुळे “आदिवासी उपयोजनांचा अनुसूचित जामतीवर (आंध समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामाचा अभ्यास” हा विषय निवडण्यात आलेला आहे.

- अभ्यास विषयाचे महत्व :–

भारतीय समाज व्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणजे आदिवासी समाज होय. विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या एखद्या घटकाच्या समस्येकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्व समाजांचा विकास घडून आणणे अभिप्रेत असते म्हणून शासनस्तरावरुन इतर समाजापेक्षा मागासलेल्या आदिवासी जमातीच्या आर्थिक, सामाजिक यांच्यातील अंतर कमी करून आदिवासी जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध आदिवासी उपयोजना **(Tribal Sub-Schemes)** राबविण्यात येतात या आदिवासी उपयोजनांचा अनुसुचित जमात आंध समाजावर झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामाचा सखोल अभ्यासकरून या हिंगोली जिल्हयातील अनुसुचित जमात आंध समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही शिफारशी, उपाययोजाना करण्यासाठी त्याच बरोबर आदिवासी आंध जमातीवरील परिणामाचे वास्तव दर्शन नेमके कसे आहे हे तपासून पाहण्यासाठी अभ्यास विषयाचे महत्व असणार आहे.

- गृहीतकृत्ये **(Hypothesis) :-**

संशोधनाची दिशा आणि व्याप्ती निश्चित करण्यासाठी पुढील गृहितके खालील प्रमाणे निश्चित केली आहेत.

1) हिंगोली जिल्हयातील अनुसूचित जमात आंध समाज आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेला आहे.

2 हिंगोली जिल्हयातील अनुसूचित जगात आंध समाज शेतमजुरी, शेती,सालगडी,मासेमारी मधगोळा करणे, डिंक गोळा करणे, उस तोडीवर जाणे अशी कामे करीत आहेत.

3 हिंगोली जिल्हयातील अनुसूचित जमात आंध समाजाचे समाजाचे साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहेत.

4 आदिवासी उपयोजनाचा लाभ ज्या आदिवासी आंध घटकाला मिळाला आहे. त्यांची अल्पशा प्रमाणात सुधारणा झालेली दिसून येते.

- संशोधन पध्दतीचे उददीष्टे **(Objectives Research) :-**

"आदिवासी उपयोजनांचा अनुसूचित जामतीवर आंध समाज झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामाचा अभ्यास – संदर्भ हिंगोली जिल्हा " प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे उददीष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

1 आंध समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करणे.

2 आंध समाजातील शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक मागासलेपणाची कारण मिमांसा करणे.

3 आंध समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी शासन राबवित असलेल्या योजनांचा आढावा घेणे.

4 हिंगोली जिल्हयात आदिवासी उपयोजनेअंतर्गत 2004–05 ते 2013–14 या काळात करण्यात आलेल्या खर्चाचा अभ्यास करणे.

5 या योजनेची कार्यक्षम अंमलबजावणी होवून परिणामकारक फलश्रुती निष्पन्न होण्यासाठी विश्लेषणात्मक निष्कर्षाच्या आधारे, आवश्यक शिफारशी करणे.

- **संशोधन पध्दती (Research Methodology) :-**

प्रस्तुत संषोधनाचे शिर्षक “आदिवासी उपयोजनांचा अनुसूचित जमातीवर (आंध समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामाचा अभ्यास :– विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा कालखंड 2004 ते 2014 ” असे असुन या संशोधनामध्ये कार्यक्षेत्र महणुन हिंगोली जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. या जिल्हयामध्ये एकुण 5 तालुके आसून ते पुढील प्रमाणे आहेत. कळमनुरी, औंढा (ना), वसमत, सेनगांव, हिंगोली या तालुक्यातील (आंध) समाजातील आदिवासी उपयोजनांच्या एकुण लाभ्यार्थ्यांपैकी प्रत्येक तालुक्यातील सरासरी 70 याप्रमाणे एकुण 350 लाभार्थांची नमुना म्हणुन निवड करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधना करीता प्राथमिक आणि दुयम सामग्रीचा वापर करण्यात येईल.
प्राथमिक साधन सामग्रीमध्ये प्रश्नवाली, मुलाखतीचा व अनुसुची या साधनांचा वापर करण्यात येईल. त्याप्रमाणे व्दितीय साधनसामग्रीमध्ये वार्षिक अहवाल, समित्याचे अहवाल, खाजगी व शासकिय संकेतस्थळे, मासिके, वर्तमानपत्र, अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित साहित्य, ग्रंथ, अहवाल मुखपत्रे इत्यादी आधार सामग्रीचा वापर करण्यात येईल.

- **संशोधनाची मर्यादा :–**

प्रस्तुत विषयाचे कार्यक्षेत्र हिंगोली जिल्हयापुरते मर्यादित आहे. सदरील संशोधानात अभ्यासासाठी घेण्यात आलेल्या हिंगोली जिल्हयातील अनुसूचित जमात (आंध) समाजासंदर्भात प्राप्त झालेले निष्कर्ष हिंगोली जिल्हयाबाहेरिल अनुसूचित जमातीस तंतोतंत लागु पडतीलच असे नाही.

- <u>प्रकरणाची रूपरेषा :–</u>

प्रकरण 1 ले – प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

प्रकरण 2 रे – आंध जमातीच्या ऐतीहासिक,सामाजीक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास.

प्रकरण 3 रे – हिंगोली जिल्हयाचा सामाजीक आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा

प्रकरण 4 थे – आदिवासी उपयोजनेचे अध्ययन 2004 ते 2014

प्रकरण 5 वे – हिंगोली जिल्हयातील आंध जमातीवर आदिवासी उपयोजनांचे झालेले परिणाम

प्रकरण 6 वे – निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसुची प्रश्नावली

संदर्भसूची

1) आदिवासी विकास प्रशासन :– डॉ. एस.जी. देवगावकर, श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर.

2) भारतातील आदिवासी समाज :– डॉ. सुधाकर एल. जाधव, चिन्म प्रकाशन, औरंगाबाद.

3) आदिवासी अस्मितेचा शोध :– प्रा. माधव सरकुंडे, देवयाणी प्रकाशन, चाणक्य नगरी यवतमाळ.

4) पैनगंगा नदीच्या खो–यातील :– प्रा. गोंविंद गारे, श्री. विद्या प्रकाशन
आंध आदिवासी

5) आंध जमात शोध आणि बोध :– डॉ. राजेष धनजकर, अनुराधा पब्लिकेषन, नांदेड

6) महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन विकास मंडळ माहिती पुस्तिका

7) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका 2013–14

8) जनगणना विश्लेषण भारत :– संपादन व संकलन अजित कुमार, बी. पब्लिकेशन पुणे महाराष्ट्र

9) महाराष्ट्र शासन जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, हिंगोली.

10) 2004.05 ते 2014.15 अर्थ साांख्यकिय संचालनाय, मुंबई

11) बॅचमार्क सर्वे 1996.97 आदिवासी संषोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

12) आदिवासीचे सामाजिक जीवन – डॉ. विलास सांगावे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – 1969

13) सौ. मंगला घोडे एकात्मिक ग्रामिण विकास योजनेअतंर्गत दिलेल्या लाभाचे मुल्यमापन

14) आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे़.

15) मुणगेकर भालचंद्र आर्थिक विकास व सामाजिक न्याय, लोकराज्य माहिती व जनसंपर्क महासंचालनायल, महाराष्ट्र शासन, मुंबई ऑक्टोबर 2006

16) मारोती विरभद्र तैगमपुरे – किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनेचे मुल्यमापन, अर्थ संवाद, जुलै – सप्टेंबर 2008

: मार्गदर्शक :

प्राचार्य डॉ. जे.एस. भोयर

कै. बाबुराव पाटील कला, विज्ञान

महाविद्यालय, हिंगोली – 431513

संशोधक विद्यार्थी

मंगल नागोराव मारकड